करमाळा तालुक्याचे लोकप्रिय मुखपत्र...
साप्ताहिक कमलाभवानी
# संदेश
वर्ष 34 वे
www.saptahiksandesh.com

संस्थापक संपादक
डॉ.ॲड.बाबूराव हिरडे
संपादक
सौ.उषादेवी बाबूराव हिरडे
वेताळ पेठ, करमाळा, जि.सोलापूर
मो.९४२३३३७४८०

आपल्या व्यवसायाची ऑनलाईन जाहिरात करण्यासाठी उपयुक्त ठिकाण
साप्ताहिक संदेश ऑनलाईन न्यूज पोर्टल
संपर्क 9822058106
संदेश ऑनलाईन न्यूज पोर्टल
करमाळा तालुक्यातील विविध घडामोडी तातडीने आपल्या मोबाईलवर मिळविण्यासाठी साप्ताहिक संदेशच्या व्हॉटस् ॲप ग्रुपला जॉईन व्हा...
www.saptahiksandesh.com
9822058106

रजि नं.७०४९७/९८ (दिल्ली) | पोस्ट परवाना PPR/01/2021-2023 | वर्षे ३४ वे | अंक क्र.२५ | पाने-१२ | दि.५/७/२०२४ | दर शुक्रवारी प्रसिध्द | किंमत ४ रू.

मजबूती आणि विश्वास एकाच ठिकाणी...!
प्रोप्रा.अमोल ढवळे मो.९८५०१२५५६१
शिवम बिल्डींग मटेरियल सप्लायर्स
आयकॉन स्टील व सिमेंटचे अधिकृत विक्रेते
PARAS Group of Industries
आमच्याकडे नामांकित कंपनीचे स्टील, सिमेंट, सनला, पत्रे, चैनल, पाईप, क्रशसॅन्ड व खडी तसेच बांधकामासाठी लागणारे मटेरीयल होलसेल दरात मिळेल.
पत्ता : बायपास रोड, निलज चौक, संत निरंकारी मंडळ शेजारी, करमाळा

# लाडकी बहिण योजना - बहिणी जोमात - १७०० महिलांचे अर्ज दाखल

करमाळा : मुख्यमंत्री लाडकी बहिण योजना घोषित झाल्यापासून तालुक्यातील बहिणी जोरदारपणे कामाला लागल्या असून प्रत्येक ई-सेवा केंद्रावर मोठी गर्दी आहे. आत्तापर्यंत १७०० महिलांचे अर्ज दाखल झाले आहेत.

राज्यशासनाने राज्याच्या बजेटमध्ये मुख्यमंत्री माझी लाडकी बहिण योजना जाहीर केली आहे. यामध्ये सुरूवातीला २१ ते ६० वयाच्या महिलांना दरमहा १५०० रूपये देणार असल्याचे जाहीर केले होते. अलिकडे हे वय ६५ वर्षापर्यंत वाढवलेले आहे. या योजनेत




विवाहित, घटस्फोटीत, विधवा, परित्यक्ता व निराश्रीत महिलांना लाभ मिळणार आहे. ज्या महिलांचे वार्षिक उत्पन्न अडीच लाखापेक्षा कमी आहे किंवा भगवे अथवा पिवळे रेशनकार्ड आहे त्यांना ही मदत केली जाणार आहे.

सुरूवातीला १५ जुलै पर्यंत अर्ज मागविले होते, आता हे अर्ज ३१ ऑगस्ट पर्यंत दिले तरी चालणार आहेत. त्यांना १ जुलै पासून हे अनुदान दिले जाणार आहे. महिलेच्या नावावर जमीन असलीतरी चालेल अशीही दुरूस्ती करण्यात आलेली आहे.



करमाळा तालुक्यातील प्रत्येक गावातून या योजनेसाठी चांगला प्रतिसाद मिळत आहे. या योजनेमध्ये सुलभ अटी असून प्रत्येक महिलांनी आधारकार्ड, जन्माचा दाखला किंवा शाळा सोडल्याचा दाखला, उत्पन्नाचा दाखला किंवा पिवळे किंवा केशरी रेशनकार्ड, अर्जदाराचे हमीपत्र, बँक पासबुक झेरॉक्स व अर्जदाराचा फोटो ऑनलाईन किंवा ऑफलाईन हा अर्ज भरावा. भरलेला अर्ज अंगणवाडी सेविकेकडे दिला तरी तो स्विकारला जाईल. आत्तापर्यंत तालुक्यातून १७०० अर्ज आले आहेत. काहीही अडचण असल्यास महिलांनी थेट तहसील कार्यालयाशी संपर्क साधावा. कुठल्याही एजंटाला भेटू नये अथवा कोणालाही पैसे देवू नयेत.

...शिल्पाताई ठोकडे (तहसीलदार करमाळा)

आशिर्वाद



स्व.डॉ.रतनलाल माणिकचंद शहा-जवळेकर

शहा हॉस्पिटल (जवळेकर)

आता नवीन रूपात.. नवीन जागेत.. स्थलांतर

उपलब्ध सुविधा
- डी.आर.डिजीटल एक्स-रे
- अल्ट्रा सोनोग्राफी
- कॉम्प्युटराईज्ड लॅबोरेटरी
- सरकारमान्य कुटूंब नियोजन व गर्भपात केंद्र
- सुसज्ज ऑपरेशन थिएटर
- अतिदक्षता विभाग
- हायस्पीड स्पायरल सिटीस्कॅन इन कॅम्पस्
- कलर डॉपलर
- ई.सी.जी.
- सर्जीकल होम
- फिजिओथेरपी
- सी-आर्म
- गॅस्ट्रोस्कोपी


I.C.U.

Multislice CT Scan

Gastroscope


DR Digital X-Ray

C-Arm

Pathology

E.C.G.

Pulse Oxymeter

Colour Doppler Sonography

Ventilator


डॉ.राजेश आर. शहा
एम.बी.बी.एस., डी.सी.एच. (बालरोग तज्ञ)


डॉ.संदेश आर. शहा
एम.एस.(जनरल सर्जन)




पत्ता : मेनरोड, करमाळा.,जि.सोलापूर

जीवनामध्ये यशस्वी होण्यासाठी काही तत्व पाळलीतरच जीवन यशस्वी होते.

**संपादकीय.............................................!**

# मनाची लढाई

महाभारतामध्ये कौरव-पांडव यांचे सत्तेसाठी युध्द झाले. भिष्मपितामह हे कौरवाच्या बाजूला म्हणजे पांडवांच्या विरोधात लढले. भिष्म हे फार मोठे योध्दे होते, पण ते असत्याच्या बाजूला झुकले होते. त्या लढाईत अपयश येणार, हे त्यांना माहित होते पण त्याला पर्याय नव्हता. कौरवाच्या बाजूला असल्यामुळे त्यांना शेवटपर्यंत लढावे लागले. कृष्णाच्या सल्ल्याने पांडवांनी भिष्माचा पराभव करण्यासाठी शिखंडीला पुढे केले (तो धड पुरूष नव्हता व स्त्री नव्हता) शिखंडीवर भिष्माने शस्त्र चालवणे बंद केले आणि त्याचा फायदा घेऊन अर्जुनाने भिष्माचार्यावर बाण मारून त्यांना शरपंजरी केले. भिष्मांना इच्छाधारी मरणाचा वर होता. हजारो बाण मारल्यानंतरही, त्या बाणावर भिष्माचार्य ५८ दिवस पडून होते. या युध्दात कौरवसेना मारली व पांडव सत्तेवर आले. युधीष्ठर राजा झाला, राज्यभिषेक झाला व त्यानंतर कृष्ण व युधीष्ठर हे कुरूक्षेत्रावर भिष्माला भेटण्यास आले. त्यावेळी युधीष्ठर भिष्माला भेटण्यास कचरत होता; पण कृष्णाने मध्यस्थी केली व भिष्मांचे दर्शन युधीष्ठराने घेतले. त्यावेळी भिष्म पांडवावर रागवलेला नव्हते, उलट ते म्हणाले..'युध्दात समोरच्याला नामोहण करणे हे क्षत्रियाचे कर्तव्य आहे.' त्यावेळी शरपंजरी भिष्मांना युधीष्ठराने राजकारभाराबद्दल प्रश्न केले, 'राज्य कसे करावे..? राजाने कसे वागावे..? प्रजाचे रक्षण कसे करावे..?' या प्रश्नाची उत्तरे त्याकाळच्या स्थितीवरून भिष्म पितामह यांनी दिली. ती उत्तरे आजही उपयुक्त आहेत.

भीष्मपितामह म्हणाले, त्याचा सार... "पशुपक्षांनाही आपल्यावर अन्याय झालातर न्याय मागता आला पाहिजे. राजाने न्यायदान करतानाच न्यायाधीशासारखे व प्रशासन करताना राजासारखे आणि राज्य करताना नम्रसेवकासारखे वागावे. प्रजेचे रक्षण केवळ परकीयांपासून नाहीतर स्वकीयापासून, अंतर्गत कलहापासून करावे तसेच त्यांच्या दैनंदिन प्रपंचात आनंद उत्पन्न होईल अशा बाबी देवून रक्षण करावे." भीष्माने युधिष्ठराला मार्गदर्शन करताना असे सांगितले, की "गरज असेलतर राजाने बोलावे व जे बोलायचे ते सत्य बोलावे. राजाचे बोलणे शांतीप्रद, सुखप्रद, सारगर्भित व विवेकप्रद असावे. मनुष्य जीवनात कोणतेही सुख शाश्वत नाही. लहानपणचे सुख किशोरावस्थेत नाही, किशोरावस्थेतील सुख तारूण्यात नाही आणि तारूण्यातील सुख वृध्दपकाळात नाही. संसाराचे सार शरीर आहे. शरीर आहेतर सर्व काही आहे. शरीराचे सार इंद्रिय आहे. इंद्रिय व्यवस्थित तर शरीर व्यवस्थित. इंद्रियाचे सार मन आहे. जसे मन तसा व्यवहार आहे. मनाचे सार बुध्दी, बुध्दीचे सार चित्त आणि चित्ताचे सार आत्मा. राजकारण असो की समाजकारण असो अथवा व्यापार असो. मनुष्य तो मनुष्यच. त्यामुळे मनुष्याने नेमके का व कशासाठी जगायचे, याचे धोरण आखले पाहिजे" हे भीष्माने राजा युधीष्ठराला शेवटच्या क्षणी समजावले आहे. युधीष्ठराला एकदा यक्षाच्या प्रश्नाची उत्तरे द्यावी लागली. त्यावेळी यक्ष विचारत होता व युधीष्ठर उत्तर देत होता. मनुष्याला साथ कोण देतो..? मनुष्याला साथ त्याचे कर्म (कर्तव्य) देते. मनुष्याने यश मिळाल्यावर काय करावे..? संयम राखावा. हवेपेक्षा गतिमान कोण..? मन. मनुष्याने कशाचा त्याग केल्यानंतर मनुष्य लोकप्रिय होतो ? अहंकाराचा. मनुष्याने काय सोडल्यानंतर दु:ख होत नाही.? लोभ. मनुष्य कोणत्या गोष्टीचा त्याग केल्याने श्रीमंत बनतो.? लाज. मनुष्याचे जीवन सुखी होण्यासाठी कोणता उपाय करावा.? मत्सर सोडावा. चांगल्या स्वभावाचा सर्वोत्तम लाभ कोणता, ?जीवलग मित्र. उत्तम आरोग्यासाठी काय महत्वाचे.?योग्य आहार-योग्य विहार . अशा काही प्रश्नोत्तरामुळे मनुष्याच्या जगण्याला निश्चित दिशा मिळते.

खरंतर माणसाच शरीर हेच युध्दभुमी आहे. युध्दभुमीवर दोन योध्दे लढतात. या युध्दभुमीवर मनार्तंगत दोन विचाराची लढाई होते. जिथे विचाराची लढाई सुरू असते त्या शरीरात जीवंतपणा असतो. जिथे लढाई नाही ते शरीर मुर्दाड समजले जाते. विचारातून जिथे निर्णय घेतला जातो, त्याची अमंलबजावणी केली जाते.तिथे चांगले फळ मिळते. ते आयुष्य सार्थकी तर लागतेच पण त्या व्यक्तीला भविष्यही चांगले लाभते. ज्या युध्दभुमीवर विचाराची लढाई होत नाही,तिथे समजायचे की ती युध्दभुमी बरबाद झाली आहे. जिथे व्यसन,आणि फॅशन तिथे आरोग्याचे ऱ्हास असतो. अर्थातच ते जीवन ,जीवनच रहात नाही. थोडक्यात जीवनात यशस्वी होण्यासाठी विचाराची लढाई महत्वाची आहे. जीवन म्हटले की यश-अपयश आलेच. बऱ्याचवेळा अपयश आले की माणूस थकतो, निराश होतो, कधी कधी त्याचा जगण्यावरचा विश्वास उडतो. खरं तर यशाचा रस्ता अपयशाच्या दारावरून जातो हे विसरतो. अशा वेळी हिम्मत महत्वाची असते. जो माणूस हिम्मत ठेवून लढत जातो तोच स्पर्धेत टिकतो , एवढेच नाहीतर तो त्यात यशस्वी सुध्दा होतो. जोपर्यंत माणूस संघर्ष करतो तोपर्यंत त्याच्या यशाची अपेक्षा असते, ज्यावेळी तुम्ही संघर्ष थांबवता तेंव्हा यशाचा मार्ग बंद पडतो हे लक्षात घेतले पाहिजे. जगातील अनेक लोक न थकता प्रयत्न करत होते म्हणून ते यशस्वी झाले. एडीसन बल्पचा शोध लावण्यासाठी प्रयत्न करत होता.असे म्हणतात त्याचे शेकडो प्रयोग फेल गेले पण त्यांनी प्रयत्न सोडले नाही, तो यशस्वी झाला.

आपण अनेक उदाहरणं पाहतो की, हाताशी काहीही नसताना अनेकजण लढत जातात आणि यशस्वी होतात. अशी एक ना अनेक उदाहरणे आहेत. आपल्या जवळ आहेत पण आपण त्याकडे लक्ष देत नाही. जीवनात मज्जा कशात आहे ..? याचे उत्तर योग्यरितीने समजलेतर खरच जगणं सार्थकी लागते. अनेक लोक सैराटपणा, व्यसनात आणि खाण्यापिण्यात मज्जा असल्याचे बोलतात आणि त्यात आयुष्य वेचतात. खरंतर त्यांच आयुष्य मोठ असूनही ते अल्पायुषी ठरतात. खरी मज्जा मोठं स्वप्नं पाहणं व ते स्वप्नं साकार करणे यात असते. जीवनात काय करायचे असे उद्दीष्ट ठरवून जो वाटचाल करतो तो योग्य मार्गावर चालतो व इच्छीतस्थळी पोहोचतो. पण जर उद्दीष्टच नसेल तर ..? तर ते जगणं दोरा तुटलेल्या पतंगाप्रमाणे असते, दावे तुटलेल्या वासरासारखे असते, कोठे ही भटकते आणि कोठेही पडते. संत तुकाराम महाराज म्हणतात. 'आयुष्याच्या साधने सच्चितानंद पदवी घेणे..।' खरंतर ही पदवी काही कोणत्या विद्यापीठात मिळत नाही. ती पदवी आपल्या परिसरातील स्थितीतूनच मिळते. त्यासाठी तन-मनाची लढाई महत्वाची आहे. ती सुरू ठेवणे गरजेचे आहे.

## निंभोरे येथे माझी लाडकी बहिण योजनेचा लोकार्पण सोहळा



करमाळा(सं.प्र.) : निंभोरे येथे कृषी दिनानिमित्त मुख्यमंत्री माझी लाडकी बहिण योजनेचा लोकार्पण सोहळा व कृषी संजीवनी कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाची सुरुवात दिपप्रज्वलनाने करण्यात आली व सांगता वृक्षारोपणाने झाली. यावेळी विद्यार्थ्यांनी आपले मनोगत व्यक्त करत शेतकरी बांधवांच्या व्यथा मांडल्या. यावेळी सारथी शिष्यवृत्ती प्राप्त विद्यार्थी श्रध्दा वाघमारे, मधुरा वळेकर, शिवराज कन्हेरे यांचा सन्मान करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सरपंच रविंद्र वळेकर हे होते. यावेळी वळेकर यांनी मुख्यमंत्री माझी लाडकी बहिण योजनेचा लाभ घेण्याचे आवाहन करत योजनेतील त्रुटी व त्यावरील उपाययोजना यावर मार्गदर्शन केले. काही अडचणी असल्यास तातडीने संपर्क साधा. आम्ही सर्वोतोपरी मदत करू; असे सांगितले.

यावेळी उपसरपंच अनिता पाटील, उमेद अभियानचे तालुका व्यवस्थापक योगेश जगताप, मंडल कृषी अधिकारी मधुकर मारकड, कृषी पर्यवेक्षिका रोहिणी सरडे, प्रताप तळेकर, बी.के.बेरे, आकाश पवार, हनुमंत पवार, दौंडे भाऊसाहेब, कांबळे, जगदाळे, मुख्याध्यापक व्यवहारे, सर्व शिक्षक, आशासेविका, सीआरपी सुषमा वाघमारे,मंजुश्री मुळे, शितल दळवे, ग्रा.पं.सदस्य दिपक माळी, प्रविण वळेकर, दत्ता वळेकर, समाधान गाडे, समाधान वळेकर, लक्ष्मण वळेकर, राज पठाण सह ग्रामस्थ उपस्थित होते.

## माझी लाडकी बहिण योजनेचे महिलांनी लाभ घ्यावा : रेणुका सोरटे



करमाळा(सं.प्र.) : मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी जाहीर केलेल्या माझी लाडकी बहिण या योजनेचे श्रीदेवीचामाळ येथील सरपंच रेणुका सिध्देश्वर सोरटे यांनी स्वागत केले असून सदर योजनेमुळे महिला सक्षमीकरणास फायदा होईल. महिलांनी या योजनेचा लाभ घ्यावा; असे आवाहन सरपंच रेणुका सोरटे यांनी केले आहे. पुढे बोलताना सरपंच सौ.सोरटे यांनी सदर योजनेसाठी अर्ज लाभार्थीना संकेतस्थळ उपलब्ध करून दिले जाईल. प्राप्त अर्जाची पडताळणी ग्रामसेवक, अंगणवाडी पर्यवेक्षक, प्रकल्प अधिकारी, अंगणवाडी सेविका करतील. त्यांच्याकडील अर्ज आमच्याकडे आल्यावर आम्ही सदर यादी अंतिम करून जिल्हाधिकाऱ्यांकडे सादर करू. त्यानंतर जिल्हाधिकारी यांचे अध्यक्षतेखालील समिती लाभार्थींची अंतिम यादी जाहीर करेल;.यावेळी श्रीदेवीचामाळ येथील बचत गटाच्या व इतर महिला उपस्थित होत्या.

सा.कमलाभवानी संदेश हे साप्ताहिक प्रकाशक, मालक, मुद्रक सौ.उषादेवी बाबूराव हिरडे यांनी संदेश प्रिंटर्स, वेताळपेठ, करमाळा येथे संपादक म्हणून सौ.उषादेवी बाबूराव हिरडे यांनी छापून तेथेच प्रसिध्द केले. (या अंकातील मजुकराशी संपादक सहमत असतीलच असे नाही.)

# शनैश्वर दिंडीचे १२ जुलैला पंढरपूरकडे प्रस्थान



करमाळा(सं.प्र.) : श्री क्षेत्र शनीशिवपूर (पोथरे) ते श्री क्षेत्र पंढरपूर या आषाढी वारी जनजागरण अभियान पायी दिंडी सोहळ्याचे १२ जुलैला सकाळी नऊ वाजता पोथरे येथून पंढरपूरकडे प्रस्थान होणार आहे; अशी माहिती दिंडीचालक ह.भ.प.अ‍ॅड. डॉ.बाबुराव हिरडे यांनी दिली.

शनैश्वर दिंडीचे २६ वे वर्षे असून ही दिंडी पोथरे येथून पंढरपूर पर्यंत जाताना हरिपाठ, भजन, प्रवचन, किर्तन याबरोबरच ग्रामसुधार समितीच्या वतीने पोस्टर प्रदर्शन, सामाजिक प्रबोधनात्मक माहितीपट व जनजागरणाचे कार्यक्रम सादर करते. तसेच वृक्षारोपण, जनजागृती व व्यसनमुक्ती व प्रबोधनाचे कार्यक्रम गावोगावी करत पंढरपूर पर्यंत जाऊन एक आगळा-वेगळा उपक्रम राबवित असते. सदरची दिंडी करमाळा, गुळसडी, वरकटणे, निंभोरे, वडशिवणे, सापटणे(टें), परिते, सुगाव(भोसे), गुरसाळे मार्गे पंढरपूराला जाणार आहे. तरी या दिंडीत जास्तीत जास्त भाविकांनी सहभागी व्हावे; असे आवाहन करण्यात आले आहे.

# घारगाव सोसायटीच्या चेअरमन पदी कल्याण होगले



करमाळा(सं.प्र.) : घारगाव विविध कार्यकारी सेवा सोसायटीच्या चेअरमन पदी माजी आमदार जयवंतराव जगताप गटाचे कल्याण होगले यांची तर व्हा.चेअरमन पदी अन्नपूर्णा शिंदे यांची बिनविरोध निवड करण्यात आली आहे. निवडीनंतर श्री.जगताप यांचे हस्ते नूतन चेअरमन व व्हा.चेअरमन यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी घारगावचे माजी सरपंच रामलिंग देशमुखे, बाळेवाडी सोसायटीचे चेअरमन वंदन नलवडे, कामोणे सरपंच रमेश खरात, विकास पाटील, लक्ष्मण पवार, बाळासाहेब खराडे सह सोसायटीचे सदस्य अंगद पवार, किरण पाटील, चंद्रकांत देशमुखे, संदिपान गायकवाड, बाळासाहेब हांडे, सतीश पवार, हाजी भाई तांबोळी, आसू केसकर, बिभिषण कात्रजकर, दत्तात्रय मस्तूद, दगडू गायकवाड आदी उपस्थित होते. आभार सोसायटीचे सचिव आरीफ पठाण यांनी मानले.

# शिष्यवृत्ती परीक्षेत वरकटणे शाळेतील तीन विद्यार्थी गुणवत्ता यादीत



करमाळा(सं.प्र.) : महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे यांचे वतीने सन २०२३-२४ मध्ये घेण्यात आलेल्या इ.५ वी शिष्यवृत्ती परीक्षेत वरकटणे जिल्हा परिषद शाळेतील तीन विद्यार्थी गुणवत्ता यादीत चमकले आहेत. यामध्ये वेदांत सचिन व्हटकर, उदयसिंह कुमार मस्कर व आदित्य नितीन व्हटकर या तिघांचा समावेश आहे. या तीनही विद्यार्थ्यांना वर्गशिक्षक सचिन व्हटकर यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले. यशस्वी विद्यार्थी, मार्गदर्शक शिक्षक यांचे अभिनंदन मुख्याध्यापक, सर्व शिक्षक, केंद्रप्रमुख, गटशिक्षणाधिकारी, शाळा व्यवस्थापन समिती यांनी केले आहे. शाळेच्या वतीने गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी सर्व शिक्षक स्टाफ उपस्थित होते.




## प्रियंका आय केअर हॉस्पीटल



पुणे रोड, त्रिमुर्ती कुशनचा वरचा मजला, करमाळा. मो.9423222266, 9604762600

उपलब्ध सुविधा... डोळ्यांच्या आजारावरील निदान व उपचार केंद्र

- मोतीबिंदू, काचबिंदू, नासूर, तिरळेपणा, दृष्टिदोष वरील निदान व उपचार
- जपानच्या अत्याधुनिक मशीनव्दारे शास्त्रोक्त पध्दतीने तपासणी व उपचार
- फॅकोइमलसीफिकेशनी बिनटाक्याची मोतीबिंदू वरील शस्त्रक्रिया.
- सुसज्ज ऑपरेशन थिएटर
- नेत्रपटल आजाराचे निदान व उपचार
- लेसर मशीनव्दारे लेन्स वरील जाळी काढण्याची सोय
- एस्कॅन बायोनेट्री आणि केरॉटोमॅट्री

डॉ.डी.बी.केमकर
(M.S.DOMS) नेत्ररोग तज्ञ
कन्सल्टिंग ऑफ्थॅलमोलॉजीस्ट व ऑफ्थॅलमिक सर्जन

अत्याधुनिक प्रकारची लेझर सुविधा उपलब्ध ! (Nd YAG LASER) रविवारी बंद

वेळ : सकाळी १० ते ६ (सोमवार ते शनिवार)

आदिका मेडिकल, पुणे रोड, करमाळा., जि.सोलापूर



## विघ्नहर्ता इंटिरीयर

प्रोप्रा : अभिषेक कमलेश देवी
मो.9028075051

करमाळा शहरातील एकमेव 'लॅमिनेट आणि हार्डवेअर' चे भव्य शोरूम

## देवी प्लायवुड अ‍ॅन्ड हार्डवेअर

- प्लायवुड • किचनट्रॉली • वॉलपेपर
- हार्डवेअर • फेव्हिकॉल • वुडन प्लोरिंग • सनमायका



प्रोप्रा : अभिनव कमलेश देवी 9011524252

पत्ता : मेनरोड, जैन मंदिर जवळ, करमाळा., जि.सोलापूर


# शिष्यवृत्ती परीक्षेत गुरूकुल पब्लिक स्कुलचे यश

करमाळा(सं.प्र.) : दरवर्षीप्रमाणे यावर्षी गुरूकुल पब्लिक स्कुलने शिष्यवृत्ती परीक्षेत घवघवीत यश संपादन केले आहे. तसेच नऊ विद्यार्थी जिल्हास्तरीय यादीत झळकले आहेत. त्यामध्ये इ.८ वी मधील सार्थक सुर्यवंशी, आदित्य गायकवाड, शर्वरी सपकाळ, वैष्णवी वळेकर, नूतन हळनोर, इ.५ वी मधील स्वरा ओंभासे, सुप्रिया जगदाळे, अमरनाथ चिवटे, सान्हवी नेटके या विद्यार्थ्यांचा समावेश आहे.

यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन शिक्षक भगत मॅडम, नायकुडे मॅडम, घोगरे सर, आव्हाड सर तसेच संस्थेचे संस्थापक नितीन भोगे, सचिव सौ.भोगे यांनी केले.




डिस्काउंटच्या जमान्यामध्ये भव्य डिस्काउंटसह
**फ्रेश मटेरियलची हमी** फक्त **एव्हरफ्रेश सुपरमार्ट** मध्येच !

खालील सर्व ब्रॅन्डेड वस्तूंच्या MRP वर कमीत कमी

## 10% पासून 51% पर्यंत डिस्काउंट

| | |
|---|---|
| अंबारी, सुहाना, प्रविण, रामबंधू, नवजीवन हिंग, किसान, काटदरे, चिंग्ज, कुकवेल, सवई मसाले, | पारले, ब्रिटानिया, सनफिस्ट, हलदीराम चितळे, अमुल, लक्ष्मीनारायण, दावत कल्याण भेळ, सफोला, |
| कोलगेट, पतंजली, पेप्सोडेंट, मेस्वाक, बबुल, विको, मॅक्सफ्रेश, मेडिमिक्स, संतुर, डव्ह, मोती, लिरील | टाटा, सोसायटी, विक्रम, रेड लेबल, सह्याद्री, परिवार, नेस व ब्रु कॉफी, लिपटन ग्रीन टी व ड्रायफ्रुटस् |
| पॉण्डस पावडर, पॅराशुट, एचयुल, गुडनाईट, हिमालया, डाबर, गोदरेज, सर्व टूथपेस्ट व टूथब्रश | डेटॉल, हारपीक, लॉयजॉल, निरमा, रिन, टाईड, एरियल, व्हील, पितांबरी, विम, लक्स, लाईफबॉय |
| इंदुलेखा, सेसा, केशकिंग, नवरत्न, लॉरिअल पॅरिस, जस्मीन, व्हॅसलीन, निविया, फॉग, यार्डली, केएस | गाला, मिल्टन, ओरल बी, हगीज व सर्व बेबी प्रोडक्टस्, बेकरी, स्वीटस् व नमकीन, पुजा साहित्य इ. |

टीप : डिस्काउंट ऑफर, नियम व अटी समजावून घेण्यासाठी एव्हरफ्रेश सुपरमार्टला भेट द्या !

॥ नावाप्रमाणेच सर्व काही फ्रेश ॥

## एव्हरफ्रेश सुपरमार्ट

॥ प्रिमियम क्वॉलिटी ॥ ॥ भरघोस डिस्काउंट ॥

*नियम व अटी लागू

किराणा । मसाले । प्रिमियम ड्रायफ्रुटस् । बिस्कीटस् । नमकीन अ‍ॅन्ड स्वीटस् । बेकरी अ‍ॅन्ड मिल्क प्रॉडक्टस् । । नॅचरल प्रॉडक्टस् । पर्सनल, होम अ‍ॅन्ड बेबी केअर । आयुर्वेदिक वस्तु । पुजेचे साहित्य

पंढरपूर अर्बन बँके समोर, दत्तपेठ, करमाळा. मो.7059293031

# करमाळ्याची कन्या निघाली अमेरिकेला

## एम.एस.च्या शिक्षणासाठी प्रगती पवार जाणार कॅलिफोर्नियाला

करमाळा : न पूछ की मेरी मंजिल कहां है। अभी तो सफर का इरादा किया है। न हारूंगा हौंसला चाहे कुछ भी हो जाए। ए मेरे किसी और से नही, खुद से वादा किया है ॥ प्रत्येकाला जीवनात यशस्वी व्हायचे असेलतर एक स्वप्नं पाहिले पाहिजे आणि ते साक्षात साकार केले पाहिजे. त्यासाठी स्पर्धा असावी लागते, ती इतरांशी नव्हे तर स्वत:शीच असावी लागते. तर आणि तरच आपले उद्दीष्ट साध्य होते. वास्तविक पाहता स्वप्नं पाहणे सोपे असते पण ते प्रत्यक्षात आणणे कठीण असते. जर तुम्ही प्रयत्न करत राहिला तर नक्की यश मिळते.

अशाचप्रकारे करमाळा तालुक्यात सर्व क्षेत्रात अग्रेसर असणारे विजयराव पवार व सौ.वंदना पवार यांची कन्या प्रगती पवार हिने शैक्षणिक क्षेत्रात उज्वल यश मिळवले आहे. तिची मास्टर ऑफ सायन्स इंजिनियरींग मॅनेजमेंटसाठी अमेरिकेतील प्रतिथयश असलेल्या युनिव्हर्सिटी ऑफ सदन कॅलिफोर्निया लॉस एंजल्स् येथे निवड झाली आहे. लवकरच ती अमेरिकेला जाणार आहे. तिच्या या निवडीबद्दल तालुक्यातील अनेक मान्यवरांनी व संस्था प्रतिनिधींनी तिचे अभिनंदन केले आहे.



लहानपणापासून परदेशात शिक्षण घेण्याची इच्छा होती. माझे आई-वडील व बहिण रेशम (आयटी इंजि.) यांचे पाठबळ मिळाले. त्यातून मी माझे स्वप्नं सतत नजरेसमोर ठेवले. त्यामुळे अन्य कुठल्याही मोहजाळात न अडकता शिक्षणावर लक्ष ठेवून मार्गक्रमण केले. माझ्या शैक्षणिक कालावधीमध्ये मी माझ्या बहिणीबरोबर १३ वर्षात फक्त दोन चित्रपट पाहिलेले आहेत. स्वामी समर्थावरील श्रध्दा तसेच मेडिटेशनवर लक्ष केंद्रीत केल्याने मला इथपर्यंत यश मिळाले व भविष्यातही निश्चीत यश मिळणार याची खात्री आहे. शिक्षण घेत असलेल्या मुलींना एकच सांगू इच्छिते.. स्वप्नं पाहून त्याचा पाठपुरावा केला तर ते नक्की साकार होते.

**...कु.प्रगती विजयराव पवार (९३७०१२७२५५)**

कु.प्रगती पवार हिचा जन्म १७ मे २००२ ला झाला आहे. ज्युनियर के.जी. पर्यंत येथील एलिझाबेथ आसादे मॅडम यांच्या नोबल इंग्लीश स्कुलमध्ये शिक्षण झाले. त्यानंतर सेकंड ते पाचवी ग्रीन फिंगर्स स्कुल अकलुज येथे झाले. तर सहावी ते दहावी सेंट हेलेनाज स्कुल पुणे येथे झाले. अकरावी, बारावीला ती कोचीन येथे गेली होती. त्यानंतर प्राचार्य एम.एन.नवले यांच्या सिंहगड इन्स्टीट्यूट मध्ये इलेक्ट्रॉनिक्स अ‍ॅन्ड टेलिकम्युनिकेशन मधून नुकतेच तिचे इंजिनियरींग शिक्षण पूर्ण झाले आहे. पुणे येथे दोन कंपन्यात नोकरीची ऑफर असताना तिने व तिच्या आई-वडीलांनी नोकरीपेक्षा उच्च शिक्षणाला प्राधान्य दिले. यासाठी प्रगतीचे मामा स्वामी समर्थ इंजिनियरींग पुणे चे संस्थापक भास्करराव माने-देशमुख यांचे मोलाचे सहकार्य व मार्गदर्शन मिळाले. तसेच जैन शुगरचे चेअरमन गणेशराव माने-देशमुख यांचेही सहकार्य व मार्गदर्शन मिळाले. त्यानंतर तिने एम.एस. साठी प्रयत्न केला. याकरीता तिने इंजिनियरींगच्या तिसऱ्या वर्षापासून सात ठिकाणी इंटरशीप केली होती. तिची गुणवत्ता पाहून अमेरिकेतील २० टॉप रँक मधील युनिर्व्हसिटी ऑफ सदन कॅलिफोर्निया येथे तिची निवड झाली आहे. करमाळ्याच्या दृष्टीने तिचे यश महत्वाचे आहे

# जाहीर नोटीस

तमाम लोकांना विशेषत: १) श्री.योगेश सुरेश राखुंडे, रा.कानाडगल्ली, करमाळा, जि.सोलापूर २) गुलाम महमंद शरीफ सौदागर रा.मारवाडगल्ली, उस्मानाबाद, ता.जि.उस्मानाबाद यांना सदर दि.११/६/२०२४ रोजी संदेश या साप्ताहिकामधील नोटीसीस खुलासा व या नोटीसीव्दारे कळविण्यात येते की, आमचे अशिल श्री.सचिन सुभाष परदेशी रा.जवळा, ता.जामखेड, जि.अहमदनगर यांनी दिलेल्या माहितीवरून व दाखविलेल्या कागदपत्रावरून कळविण्यात येते की.. आमचे अशिल व तुम्हापैकी १ व २ यांचे मध्ये दि.१०/५/२०२४ रोजी खालील परिशिष्टात नमूद मिळकतीचे खरेदी-विक्री बाबत करारनामा करमाळा येथे नोटरी पब्लिक साहेब यांचे समोर करण्यात आलेला होता. सदर करारनाम्याप्रमाणे करारनाम्यादिवशी आमचे अशिल यांनी तुम्हांपैकी नं.१ यांचेकडून सदर व्यवहाराच्या इसारापोटी १ लाख रूपये तसेच त्यानंतर १ लाख रूपये ऑनलाईन खात्यावर मिळाले. असे एकूण २ लाख रूपये स्विकारलेले होते. सदर करारनाम्याप्रमाणे सदर करारनामा झाल्यापासून एक महिन्यात सदरचा व्यवहार तुमचेपैकी नं.१ व २ यांनी स्वत: पूर्ण करून घ्यावयाचा असे ठरलेले होते, परंतू दरम्यानच्या काळात तुम्हांपैकी नं.१ व २ यांना आमचे अशिल यांनी वेळोवेळी उर्वरित रकमेची मागणी करून सदर खरेदीखत पूर्ण करून घेणेबाबत विचारणा केली. परंतु तुमच्यापैकी नं.१ व २ यांनी सदर खरेदीखत करून घेण्यास टाळाटाळ करून सदर खरेदीखत करून घेण्यास असमर्थता दर्शवली व आमचे अशिलास आम्हांस तुमची जमीन विकत घ्यायची नाही, आम्हाला तुमच्याबाबत केलेला व्यवहार यापुढे करायचा नाही. त्यामुळे झालेला व्यवहार रद्द करायचा आहे. तुम्हांस इसारापोटी दिलेले पैसे परत करा.. असे तोंडी कळविले. त्याप्रमाणे आमचे अशिल यांनी तुमचे पैकी नं.१ यांचे खातेवरती इसारापोटी घेतलेली रक्कम रू.२ लाख

| क्र. | दिनांक | ट्रांजिक्शन आय.डी. | युटीआर नंबर | रक्कम |
|---|---|---|---|---|
| १ | १२०/६/२०२४ | T२४०६२००६५९३००८५४९२८१८९ | ४५३८५८२३७५३९ | ५०,०००/- |
| २ | २२२/६/२०२४ | T२४०६२२०१५०४४२९५६६७४२१५ | ४५४०८५९४७१४७ | ५०,०००/- |
| ३ | ३२३/६/२०२४ | T२४०६२३०२१२१४७३३२७५१४५२ | ४५४१९०६१६९५९ | ५०,०००/- |
| ४ | ४२४/६/२०२४ | T२४०६२४११४८५७१७३७०२८२९९ | ४५४२१३४७२०४० | ५०,०००/- |

येणेप्रमाणे घेतलेली संपूर्ण रक्कम तुम्हांस परत केलेली होती व आहे.

तरी आमचे अशिल यांनी तुम्हांस सदर दि.१०/५/२०२४ रोजी केलेला करारनामा रद्द करून मागितला असता, तुम्हांपैकी नं.१ व २ यांनी सदर करारनामा रद्द करून देण्यास टाळाटाळ केली. त्यामुळे सदर जाहीर नोटीसीद्वारे तुम्हांस कळविण्यात येते की, तुमचे व आमचे अशिल यांचेमध्ये दि.१०/५/२०२४ रोजी झालेला नोटरी पब्लिक यांचे समोर झालेला करारनामा या जाहीर नोटीसीद्वारे रद्द करत आहे. तसेच तुमचा आमचे अशिल यांच्याशी तसेच त्यांच्या करारनाम्यात नमूद मिळकतीशी कोणत्याही प्रकारचा कायदेशीर संबंध राहिलेला नाही. तसेच आपण दि.११/६/२०२४ रोजी दिलेल्या नोटीसीप्रमाणे यापुढे कुठलाही संबंध राहिलेला नसताना विनाकारण, बेकायदेशीरपणे नोटीसा देऊन आमचे अशिलास त्रास देऊ नये.

**परिशिष्ट :** मिळकतीचे वर्णन - तुकडी व जिल्हा सोलापूर, पोट तुकडी व तालुका करमाळा मे.दुय्यम निबंधक करमाळा यांचे कार्यकक्षेतील करमाळा ग्रामीण येथील जमीन गट नं.२१९/३/१ यासी एकूण क्षेत्र - ०१.२६ आर (०० हे. ०१ आर पोटखराब्यासहीत) यासी आकारणी रू.०२.३० पैसे पैकी ०० हे. ६२ आर (००हे. ०१ आर पोटखराब्यासहीत) यासी चतु:सीमा पुढीलप्रमाणे.. पुर्वेस - राम, लक्ष्मण व छाया परदेशी., पश्चिमेस - काझी सर यांची मिळकत, दक्षिणेस - पांडे शिव रस्ता, उत्तरेस - साडेकर यांची जमीन

ही नोटीस दिली. ता. ४/७/२०२४

**अशिला तर्फे ॲडव्होकेट**
**श्री.वाय.पी.लेकुरवाळे (ॲडव्होकेट)**
जवळा, ता.जामखेड, जि.अहमदनगर

# अल्पसंख्यांक विभागाकडून दोन कोटी निधी मंजूर : आ.शिंदे



करमाळा(सं.प्र.) : ग्रामीण क्षेत्रात मुलभूत/पायाभूत सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी महाराष्ट्र शासन अल्पसंख्यांक विकास विभाग द्वारे करमाळा तालुक्यासाठी २ कोटी रूपयाचा निधी मंजूर झाला आहे; अशी माहिती आमदार संजयमामा शिंदे यांनी दिली.

याबाबत जादा माहिती देताना आ.शिंदे म्हणाले, की या विकास निधीतून सोगाव(प) येथे कब्रस्तान वॉल कंपाउंड बांधणे व सुशोभिकरण करणे. कंदर येथे ईदगाह कंपाउंड बांधणे व परिसर सुशोभिकरण करणे. केम येथील रेल्वे लाईन लगत कब्रस्तान वॉल कंपाउंड बांधणे व पाणीपुरवठा सोय करणे. मुलाणी कोपरा ते पोपट खरबडे रस्ता कॉंक्रीटीकरण करणे. साडे येथे कब्रस्तान परिसर सुधारणा व पाणीपुरवठा सोय करणे. पुनवर, वाशिंबे, वडगाव (उ), आवाटी, उमरड येथील कब्रस्तानला वॉल कंपाउंड बांधणे, पाणीपुरवठा सोय करणे. गुळसडी, कामोणे, जातेगाव येथे दर्गाहसमोर सभामंडप बांधणे. रावगाव मस्जिद परिसर सुशोभिकरण करणे इ. कामे केली जाणार आहेत.

# श्री क्षेत्र गोदावरी धाम (बेट सरला) पायी दिंडीचे १० जुलैला करमाळ्यात आगमन

करमाळा(सं.प्र.) : श्री क्षेत्र गोदावरी धाम (बेट सरला) ते श्री क्षेत्र पंढरपूर या पायी दिंडी सोहळ्याचे १० जुलैला सायंकाळी पाच वाजता करमाळा येथे आगमन होणार आहे. सदरच्या दिंडीत तीन हजार वारकरी असून शिस्तबध्द पध्दतीने पायी प्रवास करणारी ही एकमेव दिंडी आहे. या दिंडीचे स्वागत वनारसे परिवाराच्या वतीने करण्यात येणार आहे. दिंडीचा मुक्काम नालबंद मंगल कार्यालय, करमाळा येथे असून वनारसे परिवाराच्या वतीने त्यांची जेवणाची व राहण्याची व्यवस्था करण्यात आली आहे. या दिंडीच्या दर्शनाचा लाभ करमाळा शहरातील भाविकांनी घ्यावा; असे आवाहन वनारसे परिवार तर्फे करण्यात आले आहे.



# जिल्हा परिषद सेस फंडातून शेतकऱ्यांसाठी विविध योजना

## ५ ऑगस्ट पर्यंत पंचायत समिती स्तरावर अर्ज करण्याचे आवाहन

करमाळा(सं.प्र.) : जिल्हा परिषद सेस फंडातून शेतकऱ्यांना पीक संरक्षण औजारे व उपकरणे, ट्रॅक्टर चलित औजारे, कृषी सिंचनासाठी सुधारीत औजारे साधने ५० टक्के मर्यादित अनुदानावर डीबीटी तत्वावर देण्यात येणार आहेत. यासाठी शेतकऱ्यांनी ५ ऑगस्ट २०२४ पर्यंत पंचायत समिती स्तरावर अर्ज करण्याचे आवाहन कृषी विकास अधिकारी नंदकुमार पाचकुडवे यांनी केले आहे. या योजनेमध्ये अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, अत्यल्पभूधारक व महिला शेतकरी यांना प्राधान्य राहील.

जिल्हा परिषद सेस फंडातून शेतकऱ्यांसाठी नी पिस्टन स्प्रे पंप, नॅपसॅक बॅटरी, ऑपरेटेड स्प्रे पंप, ब्रश कटर, सोलार इन्सेंक्ट ट्रॅप, रोटाव्हेटर, पल्टी नांगर, रोटरी टिलर व विडर, पेरणी यंत्र, कल्टी व्हेटर, ५ एचपी सबमर्सिबल पंप संच, डिझेल इंजिन, कडबाकुट्टी, ताडपत्री, स्लरी इ. साधने ५० टक्के मर्यादित अनुदानावर डीबीटी तत्वावर देण्यात येणार आहेत. इच्छुक शेतकऱ्यांनी स्वत:चा सातबारा, आठ अ, आधारकार्ड, बँक पासबुकच्या पहिल्या पानाची झेरॉक्स प्रत तसेच लाभार्थी अनुसूचित जाती, अनुसूचित जमातीचे असल्यास जातीचे प्रमाणपत्र व दिव्यांग लाभार्थीसाठी दिव्यांगत्वाच्या दाखल्याची झेरॉक्स प्रतीसह संबंधित पंचायत समितीकडे अर्ज करावेत. लाभार्थ्यांची निवड केल्यानंतर शेतकऱ्यांनी एक महिन्याच्या आत खुल्या बाजारातून अधिकृत विक्रेत्याकडून आपल्या पसंतीची अवजारे खरेदी करावे लागतील. खरेदी अवजारे अधिकृत सक्षम तपासणी संस्तांनी परिक्षण करून ती बीआयएस अथवा अन्य संस्थांनी निश्चित केलेल्या प्रमाणकानूसार तांत्रिक निकषानुसार असावीत. मंजूर औजारांचे अनुदान संबंधित शेतकऱ्यांच्या आधारलिंक असलेल्या बँक खात्यावर डीबीटी प्रणालीद्वारे अदा करण्यात येईल. तरी इच्छुक शेतकऱ्यांनी ५ ऑगस्ट २०२४ पर्यंत संबंधित पंचायत समिती कार्यालयाकडे परिपूर्ण कागदपत्रासह अर्ज करावेत; असेही आवाहन करण्यात आले आहे.

# दत्तकला आयडियल स्कूलचे शिष्यवृत्ती परीक्षेत यश



करमाळा(सं.प्र.) : महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद मार्फत घेण्यात आलेल्या पूर्व उच्च प्राथमिक व पूर्व माध्यमिक शिष्यवृत्ती परीक्षेत केत्तूर नं.१ येथील दत्तकला आयडियल स्कुल ॲन्ड कॉलेज मधील विद्यार्थी पवन सुभाष सामंत (इ.८ वी) याने ६१.७४ टक्के प्राप्त करून इंग्रजी माध्यमातून राज्याच्या गुणवत्ता यादीत प्राविण्य मिळवले. इंग्रजी माध्यमातून यश मिळवला पवन सामंत हा एकमेव विद्यार्थी आहे. या यशासाठी दत्तकला शिक्षण ससंथेचे संस्थापक अध्यक्ष प्रा.रामदास झोळ, उपाध्यक्ष राणादादा सुर्यवंशी, सचिव माया झोळ, स्कुल डायरेक्टर नंदा ताटे, प्रशासकीय अधिकारी डॉ.विशाल बाबर यांनी केले.


॥ द्वितीय पुण्यस्मरण ॥



तुमच्या प्रेमाचा ओलावा
कशातच नाही असा गोडवा
तुमच्या आठवणींपेक्षा
आम्हांस तुमचा सहवासच भेटावा
अजुनही वाट पाहती हे नयन
बाबा.. यावे परतुनी आपण !
पुन्हा लाभावा तुमचा सहवास,
एवढाच आमचा अट्टाहास..!

कै.शंकर महादेव सुरवसे

दि.१० जुलै रोजी असलेल्या
द्वितीय पुण्यस्मरणदिनानिमित्त आपल्या
पवित्र स्मृतीस भावपूर्ण आदरांजली !

अभिवादक
अभिजीत शंकर सुरवसे व सुरवसे परिवार, किल्ला विभाग, करमाळा.



खुशखबर मुळव्याधवर ट्रीटमेंटसाठी नको नगर–बारामती–सोलापूर खुशखबर

बार्शी येथील सुप्रसिध्द मुळव्याध तज्ञ
डॉ.विकास देविदास नागरगोजे (एम.एस.मुंबई)

आता आपल्या करमाळ्यात !

उपलब्ध सुविधा...
- मुळव्याधवर इंजेक्शन
- डिलीव्हरीनंतर उद्भवारे कोंब
- एकदा ऑपरेशन करून पुन्हा उद्भवणारे कोंब
- संडासवाटे रक्त येणे, पु येणे
- संडासची जागा बाहेर पडणे
- संडास जागी खाज व आग होणे
- संडासाचा नागवेडा
- संडास नंतर बसण्यास त्रास होणे
- भगंदर, फिशर
- चार प्रकारचे मुळव्याध (४ प्रकारचे इंजेक्शन)

ओपीडी /ऑपरेशन ठिकाण
दर गुरूवार व सोमवार
वेळ : सकाळी ९.०० ते १२.००
लोकरे हॉस्पिटल
कृष्णाजीनगर, बायपास रोड
करमाळा., जि.सोलापूर
(९८५०८५१००५)

परिचय
डॉ.विकास देविदास नागरगोजे
मुळव्याध तज्ञ
पदवी : नाशिक
पदवोत्तर : मुंबई



विशेष सुचना...
१. प्रत्येक ओपीडी दिवशी १० रूग्णांची तपासणी करण्यात येईल.
२. येताना जुन्या आजाराची फाईल घेऊन येणे.
३. इंजेक्शनचा निर्णय डॉक्टरांचा राहील.
४. तपासणी अगोदर नावनोंदणी अनिवार्य.
५. परगावच्या रूग्णांनी आदल्या दिवशी फोन करावा.

नाव नोंदणीसाठी संपर्क
मो.9763035862

बार्शी धन्वंतरी मुळव्याध सुपर स्पेशालिटी हॉस्पिटल कोर्ट समोर, बार्शी.


# अखिल ब्राह्मण मध्यवर्ती संस्थेच्या वतीने शैक्षणिक साहित्य व गणवेश वाटप



करमाळा(सं.प्र.) : अखिल ब्राह्मण मध्यवर्ती संस्था नाशिक या संस्थेच्या करमाळा केंद्राच्या वतीने राबविण्यात येणारे विविध सामाजिक उपक्रम हे प्रशंसनीय तर आहेतच, पण अनुकरणीय देखील आहेत; असे प्रतिपादन पत्रकार विवेक येवले यांनी केले.

अखिल ब्राह्मण मध्यवर्ती संस्था व गयाबाई बहुउद्देशीय संस्थेच्या वतीने एकलव्य निवासी शाळेतील विद्यार्थ्यांना शालेपयोगी साहित्य व गणवेश वाटप कार्यक्रमात श्री.येवले बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी बहुजन संघर्ष सेनेचे राजाभाऊ कदम हे होते. यावेळी एकलव्य आश्रम शाळेचे संस्थापक अध्यक्ष रामकृष्ण माने, अखिल ब्राह्मण मध्यवर्ती संस्था करमाळा केंद्रचे अध्यक्ष संतोष कुलकर्णी, ग्राहक पंचायतचे तालुका अध्यक्ष संजय मोरे,गयाबाई बहुउद्देशीय संस्थेचे किसन कांबळे, लक्ष्मण भोसले, फिटनेस ट्रेनर महेश वैद्य, संजय घोरपडे, भारत घुगेकर, सिध्दार्थ वाघमारे आदी उपस्थित होते.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक व सुत्रसंचालन शिक्षक किशोर शिंदे यांनी केले तर उपस्थितांचे आभार मुख्याध्यापक अशोक सांगळे यांनी मानले.

# माजी खासदार नाईकनिंबाळकर यांच्या निधीतून २५ हायमास्ट दिवे मंजूर

करमाळा(सं.प्र.) : करमाळा तालुक्यातील शहर ग्रामीण भागात २५ ठिकाणी माजी खासदार रणजितसिंह नाईक निंबाळकर यांच्या प्रयत्नातून हायमास्ट दिवे मंजूर झाले आहेत; अशी माहिती शिवसेनेचे जिल्हाप्रमुख महेश चिवटे यांनी दिली.

नाईकनिंबाळकर यांनी लोकसभा निवडणुकीपूर्वी या कामांना मंजुरी दिली होती. याशिवाय नाईकनिंबाळकर यांनी करमाळा शहरातील श्रीकृष्ण हॉस्पिटल शेजारी नाला ट्रेकिंगसाठी ७० रूपये देखील मंजूर केले आहेत. शिवाय शहरातील विविध विकास कामासाठी दोन कोटी रू. मंजूर केले आहेत त्याचे निवेदन निघून टेंडर प्रक्रिया सुरू आहे. तसेच नाईकनिंबाळकर यांनी खासदार निधी सोडून शासनाकडून तालुक्यात २० कोटी रू.ची विकासकामे मंजूर करून घेतली असून ती कामे आता तालुक्यात सुरू झाली आहेत. या सर्व कामाच्या उद्घाटनासाठी माजी खासदार रणजितसिंह नाईकनिंबाळकर यांना भुमीपूजनासाठी आमंत्रित करण्यात येणार आहे. तसेच यावेळी उपस्थित महायुतीच्या सर्व पदाधिकारी, अधिकारी व कार्यकर्त्यांचा मेळावा घेण्यात येणार आहे.

माजी खासदार रणजितसिंह नाईकनिंबाळकर हे लोकसभेला पराभूत झाले असलेतरी दर महिन्याला ते करमाळा दौऱ्यावर येणार असून जनता दरबार घेणार असल्याचेही शिवसेनेचे जिल्हाप्रमुख महेश चिवटे यांनी सांगितले.


पुनम एजन्सी

अंबुजा सिमेंटचे
करमाळा तालुका वितरक

• बिल्डींग मटेरियल सप्लायर्स • प्लंबींग • हार्डवेअर
स्टील, सिमेंट, फरशी, ग्रेनाईट
होलसेल व रिटेल योग्य दरात मिळेल

प्रोप्रा : प्रमोद शिंदे (9552946544) पत्ताः बायपास रोड, जेऊर.


श्रीदेवीचामाळ येथील रहिवाशी व आमचे
मित्र श्री.पद्माकर सुर्यपुजारी यांची कन्या
कु.ऐश्वर्या पद्माकर
सुर्यपुजारी
हिची पुणे येथे 'मेट्रो पायलट'
म्हणून निवड झाल्याबद्दल
हार्दिक अभिनंदन !
शुभेच्छुक
श्रीकांत गोसावी (मामा)
देवळाली, ता.करमाळा
श्रीकांत गोसावी
(जिल्हा उपाध्यक्ष, युवासेना-शिवसेना)



॥ सस्नेह निमंत्रण ॥
स.न.वि.वि. आमचे येथे श्रीहरी कृपेकरून..
चि.सौ.कां.शुभांगी (D.Ed)
कै.आजिनाथ गुंडीबा घाडगे यांची
नात व सौ.कविता व
श्री.दादासाहेब आजिनाथ घाडगे
रा.सालसे, ता.करमाळा यांची
द्वितीय सुकन्या
चि.प्रशांत (M.Sc Maths B.Ed)
कै.नाथ्याबा बाबुराव जगदाळे
यांचे नातू व सौ.सुरेखा व
श्री.रत्नसिंह नाथ्याबा जगदाळे
रा.लोणी भापकर, ता.बारामती
यांचे ज्येष्ठ चिरंजीव
यांचा शुभविवाह
रविवार दि.१४/७/२०२४ रोजी दुपारी १ वा. १३ मि.
आयोजित करण्यात आला आहे. तरी या शुभप्रसंगी वधू-वरास
शुभाशिर्वाद देण्यासाठी आपली उपस्थिती प्रार्थनीय आहे !
आपले नम्र
श्री.दादासाहेब आजिनाथ घाडगे
श्री.रमेश आजिनाथ घाडगे
समस्त घाडगे परिवार
सालसे, ता.करमाळा
विवाहस्थळ
स्वप्निल मंगल कार्यालय लॉन्स
सालसे-साडे रोड, सालसे, ता.करमाळा.
टीप : सर्वांना निमंत्रण पत्रिका दिलेल्या आहेतच. नजरचुकीने
कोणास निमंत्रण पत्रिका मिळाली नसल्यास, हेच निमंत्रण समजून
शुभकार्यास अगत्य येण्याचे करावे, ही नम्र विनंती !


सस्नेह निमंत्रण
॥ श्री गजानन प्रसन्न ॥ श्री कमलादेवी प्रसन्न ॥ जय जय रघुवीर प्रसन्न ॥
स.न.वि.वि.आमचे येथे श्रीहरी कृपेने..
वधू
चि.सौ.कां.रजनी B.Sc Agri.
स्व.नागनाथ देवराव जाधव
यांची नात व श्री.रामदास
नागनाथ जाधव रा.करमाळा
यांची द्वितीय सुकन्या
वर
चि.विशाल B.E.
स्व.बाबासाहेब रामचंद्र सरडे
यांचे नातू व श्री.बाळासाहेब
बाबासाहेब सरडरा.सोगाव(प)
ता.करमाळा यांचे द्वि.चिरंजीव
यांचा शुभविवाह
रविवार, दि.१४/७/२०२४ रोजी दुपारी १२ वा. ३२ मि.
करण्याचे योजिले आहे. तरी वधू-वरास शुभाशिर्वाद देण्यासाठी सहकुटूंब
सहपरिवार आपली उपस्थिती प्रार्थनीय आहे.. ही नम्र विनंती !
विवाहस्थळ
समर्थ मंगल कार्यालय
कुंभेज फाटा, ता.करमाळा., जि.सोलापूर.
आपले नम्र
श्री.गोरखनाथ नागनाथ जाधव
श्री.रामदास नागनाथ जाधव (मा.सदस्य, न.पा. शिक्षण मंडळ)
श्री.जालिंदर नागनाथ जाधव
समस्त जाधव परिवार, करमाळा.
टीप : सर्वांना निमंत्रण पत्रिका पाठविलेल्या आहेतच. नजरचुकीने
कोणांस ही निमत्रण पत्रिका मिळाली नसल्यास हेच निमंत्रण समजून
शुभकार्यास अगत्य येण्याचे करावे, ही नम्र विनंती !


श्री.विजयराव पवार यांची कन्या
कु.प्रगती विजयराव पवार
हिची अमेरिका येथील
University of Southern
California, Los Angeles मध्ये
Master of Science in
Engineering (M.S.) या उच्च
शिक्षणासाठी निवड झाल्याबद्दल
हार्दिक अभिनंदन !
पुढील वाटचालीस तसेच
परदेश दौऱ्यास हार्दिक शुभेच्छा !
शुभेच्छुक
श्री.विजयराव पवार
श्री.देवीदास चोपडे
श्री.सुनिलराव कवादे (पाटोदा)
श्री.ऋषिकेश चोपडे
सौ.वंदना विजयराव पवार
ॲड.रोहन चोपडे
सौ.रेशम रोहन चोपडे
श्री.मनोज पवार
श्री.सुहासराव माने (सोलापूर)
श्री.सुरज मचाले (इनामगाव)
समस्त पवार परिवार, करमाळा.


श्री.विजयराव पवार यांची कन्या
कु.प्रगती विजयराव पवार
हिची अमेरिका येथील University of Southern California, Los Angeles मध्ये Master of Science in Engineering (M.S.) या उच्च शिक्षणासाठी निवड झाल्याबद्दल
हार्दिक अभिनंदन !
पुढील वाटचालीस तसेच परदेश दौऱ्यास हार्दिक शुभेच्छा !
शुभेच्छुक
गोपाळराव सावंत, मनोज गांधी, डॉ.राजेश मेहता, बाळासाहेब रोडे
बाबुशेठ मुथा, चंद्रकांत देवी, मनुभाई देवी, महेश गवळी
व समस्त सुप्रभात मंडळ
सौजन्य..
सुरज ऑटोमोबाईल्स्
मार्केट यार्ड, करमाळा.
डिस्ट्रीब्युटर्स...
अपोलो टायर्स
apollo


श्री.विजयराव पवार यांची कन्या
कु.प्रगती विजयराव पवार
हिची अमेरिका येथील University of Southern California, Los Angeles मध्ये Master of Science in Engineering (M.S.) या उच्च शिक्षणासाठी निवड झाल्याबद्दल हार्दिक अभिनंदन !
पुढील वाटचालीस व परदेश दौऱ्यास हार्दिक शुभेच्छा !
शुभेच्छुक
ग्रामसुधार समिती
करमाळा., जि.सोलापूर
सा.संदेश परिवार
करमाळा., जि.सोलापूर


श्रीदेवीचामाळ येथील रहिवाशी व आमचे मित्र श्री.पद्माकर सुर्यपुजारी यांची कन्या
कु.ऐश्वर्या पद्माकर सुर्यपुजारी
हिची पुणे येथे 'मेट्रो पायलट' म्हणून निवड झाल्याबद्दल...
हार्दिक अभिनंदन
शुभेच्छुक
शंकर रासकर (बँक इन्स्पेक्टर), ज्ञानदेव अनारसे (सेवानिवृत्त बँक अधिकारी)
बापू भगत गुरूजी (पांडे), मनोज जाधव


॥ चौथे पुण्यस्मरण ॥
स्व.आनंद रामलिंग देशमुखे
(मृत्यू दि.१०/७/२०२०, पुण्यस्मरण दि.१०/७/२०२४)
जो आवडे सर्वांना, तोचि आवडे देवाला
नियतीचा हा खेळ निराळा, न कळला कधी कुणाला
दृष्ट लागली सुखाला, अवेळी नेले तुम्हाला
या नयनातून आश्रु सरती, दिवस न सरतो स्मृती विना
चौथ्या पुण्यस्मरण दिनानिमित्त तुझ्या स्मृतीस
भावपूर्ण आदरांजली !
शोकाकुल
रामलिंग(आण्णा) शिवमुर्ती देशमुखे (वडील/माजी सरपंच)
सौ.आशा रामलिंग देशमुखे (आई/विद्यमान सरपंच)
अश्विनी आनंद देशमुखे (पत्नी/पीएसआय), आर्यन आनंद देशमुखे (मुलगा)
सौ.निशा सागर निळकंठ (बहिण), सौ.रेखा अमर गवसणे (बहिण)
देशमुखे व मित्र परिवार तसेच समस्त ग्रामस्थ, घारगाव

## शिष्यवृत्ती परीक्षेत जेऊर येथील भारत हायस्कुलचे
# १७ विद्यार्थी पात्र तर १० विद्यार्थी जिल्हास्तरीय गुणवत्ता यादीत



करमाळा(सं.प्र.) : सन २०२३-२४ मध्ये झालेल्या शिष्यवृत्ती परीक्षेत जेऊर येथील भारत हायस्कुलचे १७ विद्यार्थी पात्र ठरले असून १० विद्यार्थ्यांची जिल्हास्तरीय गुणवत्ता यादीमध्ये निवड झाली आहे. सय्यद रिहान महेबूब, पाटकुलकर सोहम प्रशांत, साखरे विश्वजीत मदुकर, कदम आकाश परमेश्वर, पाटकुलकर रूपेश जनार्धन, जाधवर श्रेयश सयाजीराव, सानप तृप्ती किरण, व्हरे आभा यशवंत, रंदवे समीक्षा नाथराव, निमगिरे वैभवी रविंद्र या विद्यार्थ्यांचे जिल्हास्तरीय गुणवत्ता यादीमध्ये नाव आलेले आहे. शिष्यवृत्ती परीक्षेतील सर्व यशस्वी विद्यार्थी व मार्गदर्शक शिक्षकांचे अभिनंदन संस्थेचे अध्यक्ष तथा माजी आमदार नारायण पाटील, उपाध्यक्ष राजुशेठ गादीया, सचिव अर्जुनराव सरक, सरपंच पृथ्वीराज पाटील, सर्व संस्था पदाधिकारी, प्राचार्य केशव दहिभाते, उपप्राचार्य नागेश कांबळे, पर्यवेक्षक बाळासाहेब शिंदे यांनी केले.

# प्रा.अभिमन्यु माने यांना पी.एचडी पदवी प्रदान



करमाळा(सं.प्र.) : पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाने यशवंतराव चव्हाण महाविद्यालयातील प्रा.अभिमन्यु माने यांना **Linguistic Study of Kaikadi Language in Solapur District** या संशोधन विषयावर पी.एचडी (डॉक्टरेट) पदवी प्रदान करण्यात आली आहे. संशोधनाच्या मौखिक परीक्षणासाठी बहिस्थ परीक्षक म्हणून डॉ.शिवाजी सरगर, अध्यक्ष म्हणून डॉ.ॲनी जॉन आणि संशोधन मार्गदर्शक म्हणून डॉ.तानाजी कोळेकर यांची नियुक्ती करण्यात आली होती. या उल्लेखनीय कामगिरीबद्दल विद्या विकास मंडळाचे सचिव विलासराव घुमरे, अध्यक्ष मिलींद फंड, प्राचार्य डॉ.एल.बी.पाटील, उपप्राचार्य डॉ.अनिल साळुंखे व कनिष्ठ विभागाचे उपप्राचार्य संभाजी किर्दाक यांनी प्रा.माने यांचा सत्कार करून त्यांचे विशेष अभिनंदन केले. यावेळी श्री.घुमरे यांनी सर्व प्राध्यापकांनी प्रा.डॉ.अभिमन्यु माने यांचा आदर्श घ्यावा व आपली शैक्षणिक पात्रता वृध्दींगत करावी; असे मत व्यक्त केले. यावेळी विद्यालयातील सर्व प्राध्यापक व कर्मचारी उपस्थित होते.




दुध, कुल्फी, लस्सी, श्रीखंड, आम्रखंड,पनीर, ताक, खवा, तुप, क्रीम मिळण्याचे ठिकाण
हॉटेल चिवटे फॅमिली रेस्टॉरंट संगोबा रोड, श्रीदेवीचामाळ, करमाळा. मो.९८२२५०२७००
चिवटे उपहारगृह राशिनपेठ करमाळा. मो.८८८८१४७००५



करमाळा शहरात प्रथम सुरू..!
पाटील
Reg no.42433
डॉ.सौ.अर्चना दिनेश पाटील
( Clinical Cosmetologist & Trichologist )
स्किन, हेअर अॅन्ड जनरल क्लिनिक
उपलब्ध सुविधा
• त्वचा : P.R.P. चिकित्सा, I.P.R.F. चिकित्सा, P.R.P. मायक्रोक्नीडलिंग, अँटी येजिंग थेरपी, मुरूम व मुरूमाचे डाग घालवणे, बांग व व्रण घालवणे, चेहऱ्यावरील सुरकुत्या घालवणे, ब्रायडल फेशियल, मेडी फेशियल, हायड्राफेशियल, स्किन पोलिशिंग, चामखीळ काढणे, मस काढणे, पर्मनंट आयब्रो, पर्मनंट लिप कलर
• केस : P.R.P.चिकित्सा, I.P.R.F.चिकित्सा, I.J.F.C.थेरपी, टक्कल पडणे, केस गळणे, केसातील कोंडा घालवणे, केसांची वाढ खुंटणे, केस पांढरे होणे, चाई पडणे
• सर्व आजारांवर उपचार • रक्त लघवी तपासणी • लहान मुलांना वाफ देणे • सांधेदुखी, कंबरदुखी • होमिओपॅथिक उपचार


पत्ता : संगोबा रोड, श्रीदेवीचामाळ, करमाळा. मो.9604801573


## जेऊर ग्रामपंचायत व प्रवासी संघटना यांचे वतीने
# रेल्वे प्रशासनास विविध मागण्यांचे निवेदन



करमाळा(सं.प्र.) : सोलापूरचे विभागीय व्यवस्थापक नीरजकुमार डोहारे यांनी जेऊर रेल्वे स्थानकाला भेट दिली. यावेळी प्रवासी संघटना व जेऊर ग्रामपंचायत यांचे तर्फे हुतात्मा व उद्यान एक्सप्रेस गाड्यांना जेऊर येथे थांबा देण्यात यावा यासह विविध मागण्यांचे निवेदन देण्यात आले.

या निवेदनाद्वारे बेंगलोर-मुंबई उद्यान एक्सप्रेसला जेऊर येथे थांबा द्यावा, प्लॅटफॉर्म क्र.१ वर जनरल तिकीट काढण्यासाठी एटीव्हीएम मशीन बसवावी, आरक्षण खिडकी सकाळी ८ ते रात्री ८ पर्यंत चालू ठेवावी. तसेच जेऊर रेल्वे स्थानकावरून सकाळच्या हैद्राबाद-मुंबई सुपरफास्ट गाडीला प्रचंड गर्दी होत असते. प्रवासी दारात लटकून जातात. त्यामुळे इतर रेल्वे गाड्यांना थांबा देण्यात यावा आदी विविध मागण्या रेल्वे प्रशासनाकडे करण्यात आल्या आहेत. यावेळी सरपंच पृथ्वीराज पाटील, प्रवासी संघटनेचे अध्यक्ष सुहास सुर्यवंशी, उपाध्यक्ष प्रविण करे, अल्लाउद्दीन मुलाणी, राजूशेठ गादीया, मुबारक शेख, संदीप कोठारी, विनोद गरड, भूषण लुंकड, लतिफ तांबोळी, पोपट माने, प्रदीप पवार, दिनेश देशपांडे, आकाश पवार, रमीज शेख, दत्ता मारकड आदीजण उपस्थित होते. यावेळी डोहारे यांनी विविध मागण्यांचे निवेदन स्विकारून रेल्वे प्रशासन याबाबत सकारात्मक विचार करत आहे; असे सांगितले.


लक्ष्मीकांत देवी (9421063525, 8805633525)
श्रीजी इस्टेट एजन्सी
• घरजागा, दुकान जागा
• प्लॉट व बंगले
• जमीन बिनशेती करणे
• व्यवहार करून दिले जातील
• सरकारी दस्तऐवजची कागदपत्र घरपोहोच केली जातील.

पत्ता : मेनरोड, करमाळा.



आनंदऋषि नेत्रालय व्हिजन सेंटर

रेबन गॉगल, फास्ट्रॅक, लाईफस्टाईल गॉगलचे स्टॉकिस्ट डिलर अनेक व्हारायटीसह सर्व चष्मे मिळतील.



• सर्व प्रकारचे कॉन्टॅक्ट लेंस, चष्मे, गॉगल्स विक्री व दुरूस्तीचे ठिकाण
कॉम्प्युटरव्दारे मोफत नेत्रतपासणी करून मिळेल.
मोतीबिंदू बिनटाक्याची शस्त्रक्रिया : २२०० रू. (औषध व लेन्स खर्चासह)
दर महिन्याचा तिसरा रविवारी शिबीर वेळ : सकाळी १० ते २ पर्यंत
Ray-Ban गॉगल्स चे अधिकृत विक्रेते
श्री कमलादेवी ऑप्टीकल्स नगरपालिका शॉपींग सेंटर, दत्तपेठ, करमाळा.
प्रोप्रा : चाळक फिसरेकर मो.९४२३५३५४४२

# महिलेचा विनयभंग - आरोपी विरूध्द गुन्हा दाखल

करमाळा(सं.प्र.) : घरात एकटी महिला असल्याचे पाहून महिलेच्या नंदाव्याने घरात घुसून महिलेचा विनयभंग केला आहे. हा प्रकार २ जुलैला रात्री दहाच्या सुमारास वांगी नं.३ येथे घडला आहे. या प्रकरणी २६ वर्षाच्या महिलेने फिर्याद दिली आहे. त्यात तिने म्हटले आहे, की २ जुलैला रात्री माझे पती व भाचा हे दुकानाचे सामान खरेदीसाठी गेले होते. माझी सासू व नणंद या एका खोलीत बसल्या होत्या. त्यावेळी माझ्या खोलीत माझा नंदावा बाळासाहेब कांबळे हा आला व त्याने माझ्या साडीला ओढून झोंबाझोंबी करून अश्लील शब्द बोलून माझा विनयभंग केला आहे. या प्रकरणी पोलीसांनी गुन्हा दाखल केला असून पुढील तपास पोलीस निरीक्षक पोपट टिळेकर हे करत आहेत.

# टीपर चालकाकडून तलाठ्यास मारहाण

करमाळा (सं.प्र.) : वाळूचा टीपर घेऊन येत असताना तलाठ्याने पकडल्यानंतर तलाठ्याला मारहाण करून टीपर घेऊन टीपरचालक पळून गेला आहे. हा प्रकार २ जुलैला रात्री साडेआठ वाजता करमाळा–जामखेड रस्त्यावर गॅस गोडवून समोर घडला आहे. या प्रकरणी विनोद भागवत जवणे (गावकमागार तलाठी करमाळा) यांनी फिर्याद दिली आहे. त्यात त्यांनी म्हटले आहे, की २ जुलैला चोरीच्या वाळूचा टीपर येत असल्याची माहिती समजल्यावर आम्ही जामखेड रोडवरील गॅस गोडावून समोर थांबलो असता टीपर क्र.एमएच ४५ एएफ ९३४४ हा आला. त्यात काय आहे हे विचारले असता, तो रिकामा आहे असे सांगितले. त्यावेळी आमच्या पथकातील गावकामगार तलाठी रामभाऊ खुडे यांनी टिपरवर चढून पाहिले असता त्यात वाळू होती. त्यानंतर त्याला सदरचा टिपर तहसील कार्यालयात ने असे म्हटले असता, त्याने सदरचा टिपर नालबंद कार्यालय पासून त्याने कच्च्या रोडने भोसे रोडला घेऊन गेला. तेथे वाळू खाली केली. त्यावेळी आमचे तलाठी खुडे हे तेथे गेले असता, त्यांना टिपर मधून खाली ओढून मारहाण केली व टिपर घेऊन पळून गेले. या प्रकरणी पोलीसांनी गुन्हा दाखल केला असून पुढील तपास चालू आहे.

# किरकोळ कारणावरून सहा जणाकडून तरूणास बेदम मारहाण

करमाळा(सं.प्र.) : बाळूमामाच्या पालखीत जेसीबीवरून भंडारा का उधळला व गावातील बंडगराच्या पोरांबरोबर का राहतो असे म्हणून सहा जणांनी तरूणास मारहाण केली आहे. हा प्रकार भिवरवाडी येथे १ जुलै रोजी सायंकाळी साडेचार वाजता घडला आहे. या प्रकरणी प्रतापराव कृष्णकुमार आरकिले (रा.भिवरवाडी) यांनी फिर्याद दिली आहे. त्यात त्यांनी म्हटले आहे, की १ जुलैला गावात बाळूमामाची पालखी आली होती. त्यावेळी लोकांच्या सांगण्यावरून माझ्या जेसीबीतून पालखीवर भंडारा उधळला. त्यावेळी गावातील जीवन खरात, सुग्रीव खरात, छोटू खरात, बिटू चौगुले, दिगंबर खरात, शिवाजी उर्फ आप्पा खरात यांनी तु भंडारा उधळण्यासाठी जेसीबी का आणला व गावातील बंडगराच्या पोराबरोबर का थांबतो.. असे म्हणून सहा जणांनी मला लाथा–बुक्क्यांनी व लाकडी काठीने बेदम मारहाण केली आहे. या प्रकरणी पोलीसांनी गुन्हा दाखल केला असून पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक विनायक माहुरकर हे करत आहेत.

## कर्ज देतो असे म्हणून

# करमाळ्यातील व्यापाऱ्याची पावणेपाच लाख रूपयाची फसवणूक

करमाळा(सं.प्र.) : वेगवेगळ्या बँकेचे कर्ज मंजुर करून देतो म्हणून करमाळ्यातील एका व्यापाऱ्याची चौघा जणांनी वेळोवेळी ४ लाख ४७ हजार ९५८ रूपये घेऊन फसवणूक केली आहे. या प्रकरणी रूद्रकुमार धोंडिराम चोपडे यांनी फिर्याद दिली आहे. त्यात त्यांनी म्हटले आहे, की.. मला टिर्मेल फायनान्स व एचडीएफसी बँकेचे कर्ज मंजूर करतो म्हणून नितीन मारूती तारवे, अमोल बोथे (पुणे), सुनील रूपनवर(पुणे), धनंजय गायकवाड (पुणे) या चौघांनी वेळोवेळी वेगवेगळी कारणे सांगून व कर्ज मंजुरीचे खोटे पत्र देऊन ४ लाख ४७ हजार ९५८ रूपये घेऊन व कोणतेही कर्ज न देता फसवणूक केली आहे. पोलीसांनी गुन्हा दाखल केला असून पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक माहुरकर हे करत आहेत.

# प्राण्यांना निर्दय वागणूक देणाऱ्याविरूध्द गुन्हा दाखल

करमाळा(सं.प्र.) : पत्र्याच्या शेडमध्ये १७ लहान जर्सी गायीच्या खोडांना कोंबून बांधून निर्दयतेने वागणूक देणाऱ्या विरूध्द पोलीसांनी गुन्हा दाखल केला आहे. ३० जुनला रात्री पावणेबारा वाजता हा प्रकार घडला आहे. या प्रकरणी पोलीस हवालदार भाऊराव उत्तरेश्वर शेळके यांनी फिर्याद दिली आहे. त्यात त्यांनी म्हटले आहे, की बातमीदारा मार्फत बातमी मिळाल्यावर आम्ही मौलालीमाळावर गेलो असता तेथे एका पत्र्याच्या शेडमध्ये १७ जर्सी गायीची लहान खोंडे दाटीवाटीने कोंबून निर्दयतेने बांधून टाकली होती. त्यांना चारा, पाणी व औषधाची सोय केलेली नव्हती. त्यांना कत्तलीसाठी आणण्यात आले होते. यात डॉक्टरांकडून तपासणी करून या वासरांना ताब्यात घेतले आहे. ही वासरे शाहरूख सम्मद कुरेशी (रा.पंजाब वस्ताद चौक, करमाळा) यांनी आणली होती. या प्रकरणी पोलीसांनी गुन्हा दाखल केला असून पुढील तपास सुरू आहे.

# आंब्याच्या झाडावरून सहाजणाकडून चौघांना मारहाण

करमाळा(सं.प्र.) : आमच्या शेतातील आंब्याचे झाड का तोडले असे विचारल्यावरून सहा जणाकडून चौघांना बेदम मारहाण करण्यात आली आहे. हा प्रकार भाळवणी येथे २ जुलैला सकाळी साडेआठ वाजता घडला आहे. या प्रकरणी मनिषा संदीप कोपनर (रा.भाळवणी) यांनी फिर्याद दिली आहे. त्यात त्यांनी म्हटले आहे, की २ जुलैला सकाळी सव्वाआठला माझे सासरे महादेव एकनाथ कोपनर हे शेतात जातो म्हणून घरातून निघाले. त्यानंतर साडेआठ वाजता त्यांचा ओरडण्याचा आवाज आल्यानंतर आम्ही त्यांना पाहण्यासाठी गेलो असता गोरख नामदेव पाडुळे, शोभा गोरख पाडुळे, स्वप्नील गोरख पाडुळे, शुभम गोरख पाडुळे, जालिंदर नामदेव पाडुळे, सुरज गोपीचंद पाडुळे हे मारहाण करत होते. आमच्या सासऱ्यांनी आमची झाडे का तोडली असे विचारले असता, हे लोक मारहाण करत होते. त्यावेळी मी व माझी सासू शालन कोपनर, जाऊ सुषमा कोपनर असे भांडण सोडविण्यास गेलो असता या लोकांनी आम्हालाही लाथाबुक्क्यांनी व दगडाने मारहाण करून जखमी केले आहे. या प्रकरणी पोलीसांनी गुन्हा दाखल केला असून पुढील तपास सुरू आहे.

आरामदायक व सुखकर प्रवासासाठी एकच नांव...




जय बजरंगबली टूर्स & ट्रॅव्हल्स, पोंधवडी
ता.करमाळा, जि.सोलापूर



खास श्रावणमासनिमित्त
**काशी दर्शन यात्रा**
काशी, गया, अयोध्या, प्रयाग
कालावधी : दि.५/८ ते १३/८/२०२४
सहल खर्च : रू.१५,१००
(रेल्वे प्रवास ३ एसी)

खास श्रावणमासनिमित्त
**कन्याकुमारी दर्शन**
कन्याकुमारी, त्रिवेंद्रम, मदुराई, रामेश्वरम्, तिरूपती बालाजी
कालावधी : दि.२१/८ ते ३०/८/२०२४
सहल खर्च : रू.१३,८००

**चारधाम दर्शन**
यमुनोत्री, गंगोत्री, केदारनाथ, बद्रीनाथ हरिद्वार, ऋषीकेश
कालावधी : दि.१३/१० ते २७/१०/२०२४
सहल खर्च : रू.३३,०००
(रेल्वे प्रवास ३ एसी)

**केरळ दर्शन**
कोचीन, अलेप्पी, थेकड्डी, मुन्नार त्रिवेंद्रम, कन्याकुमारी
कालावधी : दि.४/११ ते १४/११/२०२४
सहल खर्च : रू.२८,०००
(रेल्वे प्रवास ३ एसी)

**राजस्थान दर्शन**
जयपुर, पुष्कर, बिकानेर, जेसलमेर जोधपुर, उदयपूर, चित्तोडगड
कालावधी : दि.१७/११ ते २८/११/२०२४
सहल खर्च : रू.२४,५००

**नेपाळ दर्शन**
वाराणसी, गोरखपूर, पोखरा, मनोकामना काठमांड, लुंबिनी, अयोध्या, प्रयागराज
कालावधी : दि.१/१२ ते १४/१२/२०२४
सहल खर्च : रू.२५,०००
(रेल्वे प्रवास ३ एसी)

**गुजरात दर्शन**
स्टॅच्यू ऑफ युनिटी, अक्षरधाम, गिरनार पर्वत, जुनागड, सोरटी सोमनाथ नागेश्वर ज्योर्तिलिंग, द्वारकाधाम
कालावधी : दि.१६/१२ ते २४/१२/२०२४
सहल खर्च : रू.१४,०००

- रेल्वे प्रवास • बस प्रवास
- भोजन व्यवस्था
- राहण्याची उत्तम सोय

**बुकींग सुरू**
नावनोंदणीसाठी त्वरीत संपर्क साधावा !

संपर्क : श्री.मयुर राऊत (८८८८३३३६३८, ९६८९४८८५८५)

# उजनी काठावरील शेती पंपाचा वीजपुरवठा आठ तास करावा : प्रा.बंडगर



करमाळा(सं.प्र.) : उजनी पाणलोट क्षेत्रात पाऊस समाधानकारक झाल्याने २३ दिवसात १८.५४ टक्के इतके पाणी वाढले असून वजा ४१.५४ टक्के पाणीसाठा झाला आहे. यामुळे उजनी जलाशय काठावरील शेती पंपाचा वीजपुरवठा पूर्ववत आठ तास करण्यात यावा; अशी मागणी उजनी धरणग्रस्त संघर्ष समितीचे अध्यक्ष प्रा.शिवाजीराव बंडगर यांनी केली आहे.

सन १९७७ पासून आजपर्यंत ४७ वर्षात सर्वात जास्त निचांकी पातळी ५९.९९ टक्के गाठलेल्या उजनी धरणातील पाणी पातळी ७ जून पासून आज अखेर २३ दिवसात सव्वादोन मीटरने वाढली आहे. त्यामुळे उजनी जलाशय काठावरील शेतकऱ्यांना दिलासा मिळाला असून, पाणीपातळी खालावल्याने हतबल झालेला, मेटाकुटीस आलेला शेतकरी आता आठ तास वीज पुरवठा चालू करण्याची मागणी करू लागला आहे. गतवर्षी कमी पडलेल्या पावसामुळे धरण केवळ ६०.५५ टक्के इतकेच भरले. त्यातच कालवा सल्लागार समितीच्या अयोग्य व ढिसाळ नियोजनामुळे बेमालूमपणे पाणी कॅनाल व नदीतून सोडण्यात आले. उजनी जलाशय काठावरील शेतकरी यास विरोध करत असताना आजी-माजी लोकप्रतिनिधींनी बघ्याची भुमिका घेतली. मात्र उजनी धरणग्रस्त संघर्ष समितीने उजनीच्या पाण्याच्या ढिसाळ नियोजनाला तीव्र विरोध केला. वरच्या धरणातून पाणी सोडण्याची मागणी रेटून धरली. शासनातील मंत्री, जिल्हाधिकारी, कालवा सल्लागार समिती यांना निवेदने देऊन चर्चा घडवून आणल्या, प्रसंगी आंदोलनही केले. निकाराचा लढा उभारला. उजनी धरणग्रस्त संघर्ष समितीचा अंकुश राहिला म्हणून तरी पाणी नियोजनाच्या बेबंदशाहीला आळा बसला. उजनी पाणी पातळी निचांकी गेल्यानंतर वीज कताप आठ तासावरून सहा तास करण्यात आली. मात्र आता उजनी पाणलोट क्षेत्रात समाधानकारक पाऊस झाल्याने शेतीपंपाचा वीजपुरवठा पूर्ववत आठ तास करण्यात यावा; अशी मागणी प्रा.शिवाजीराव बंडगर यांनी केली आहे.

# विकासशेठ आमृळे यांचेकडून विद्यार्थ्यांना वह्यांचे वाटप



करमाळा(सं.प्र.) : विकासशेठ आमृळे यांच्याकडून झरे येथील नामदेवराव जगताप माध्यमिक विद्यालय व कुलस्वामिनी प्रायमरी स्कुल या प्रशालेतील गरजू विद्यार्थ्यांना वह्यांचे वाटप करण्यात आले. त्याचबरोबर दरवर्षीप्रमाणे नियोजित उपक्रमानुसार झरे गावचे सुपुत्र राजेंद्र होनराव यांच्या मार्फत आई-वडिलांच्या स्मृतिपित्यर्थ प्रशालेतील गरजू विद्यार्थ्यांना गणवेश वाटप करण्यात आले. सामाजिक बांधिलकी जपत या मान्यवरांनी काळाची पाऊले ओळखून योग्य ठिकाणी मदत केली त्यांच्या दातृत्वाबद्दल कुलस्वामिनी प्रायमरी स्कुलच्या मुख्याध्यापिका बिले यांनी आभार मानले.

श्री गजानन अगरबत्ती
• सुगंधी अगरबत्ती • कापूर
• अत्तर • धूप • भीमसेन कापूर,
• विविध कलरची रांगोळी
• सर्व प्रकारचे लोबन,
• सर्व प्रकारचे पुजेचे साहित्य
योग्य दरात मिळेल !



पत्ता : वेताळपेठ, करमाळा., जि.सोलापूर
(प्रोप्रा : निखिल प्रदीप ढाळे, मो.8007255456)

इंदापूर(जि.पुणे) येथील सुप्रसिध्द
त्वचारोग, गुप्तरोग तज्ञ
डॉ.महेश तानाजी रुपनवर
MBBS. DDV(Bombay)
वेळ :सकाळी १० ते ११.३०
महिन्यातील दुसऱ्या व चौथ्या शनिवारी
घोलप हॉस्पिटल
करमाळा, जि.सोलापूर येथे उपलब्ध !
Facilities...
• गुप्तरोग उपचार व सल्ला • Dandruff Treatment
• Ance(pimples) Treatment • Tatto Removel by Laser
• Ance Scar Treatment • Fangal infection, Leprosy Psriasis, Eczema
• Melasma • Hair Loss • Unwanted Hair Removel by Laser
• Hyper Pigment Treatment • Skin Glow, Polishing Skin Rejuvenation
• Skin Whitening • Anti Aging • Medicated Facial
• Under Eye Dark Circles
• Skin Tag, Wart Removel



नावनोंदणीसाठी संपर्क : मो.8483822200/9421062073

# थकीत ऊस बीलासाठी १२ जुलैला हलगीनाद आंदोलन

करमाळा(सं.प्र.) : शेतकऱ्यांची ऊस बिले तात्काळ मिळवून द्यावीत. जर आम्हाला १० जुलै पर्यंत आमची बिले एफआरपी प्रमाणे १५ टक्के व्याजासहीत नाही मिळाली तर आम्ही आपल्या कार्यालयासमोर १२ जुलै रोजी सकाळी १२ वाजता हलगीनाद आंदोलन करणार; असा इशारा दत्तकला शिक्षण संस्थेचे अध्यक्ष प्रा.रामदास झोळ यांनी दिला आहे. याबाबतचे निवेदन तहसीलदार यांना देण्यात आले असून जाधव रावसाहेब यांनी सदर निवेदन घेऊन याबाबत योग्य ती कारवाई करण्याचे आश्वासन दिले आहे. प्रसिध्दी दिलेल्या निवेदनात म्हटले आहे, की कमलाई साखर कारखाना (पांडे), मकाई कारखाना (भिलारवाडी), भैरवनाथ कारखाना (विहाळ), आदिनाथ कारखाना या साखर कारखान्याचा गाळप हंगाम २०२१-२२, २०२२-२३, २०२३-२४ मध्ये शेतकऱ्यांनी ऊस गाळपासाठी दिला होता. परंतु त्याचे अद्यापही बिल आणि एफआरपी आम्हाला मिळालेले नाही. आदिनाथल, भैरवनाथ व कमलाई साखर कारखान्याकडून २०२३-२४ ची थकीत ऊसबिले एफआरपी प्रमाणे १५ टक्के व्याजासहीत येणेबाकी आहेत. मकाई कारखान्याची २०२१-२२ ची एफआरपी प्रमाणे ऊसबील १५ टक्के व्याजासहीत येणे बाकी आहेत. तसेच २०२२-२३ ची एफआरपी प्रमाणे ऊसबिल १५ टक्के व्याजासहीत येणे बाकी आहेत. तसेच वाहनमालकांचे वाहतूक, कमिशन, डिपॉझीट येणेबाकी आहे. कारखान्यातील कर्मचाऱ्यांच्या थकीत पगारी देणे बाकी आहे. नियमानूसार साखर आयुक्त महाराष्ट्र राज्य यांनी या कारखान्यांवर आरआरसी कारवाईचे आदेश दिले होते. त्यानुसार त्यांच्यावर कारवाई झालेली आहे. परंतु आजपर्यंत आम्हाला आमची ऊसबिले एफआरपी प्रमाणे मिळालेली नाहीत. १० जुलै पर्यंत सदरची बिले मिळाली नाहीतर १२ जुलैला हलगीनाद आंदोलन करण्याचा इशारा देण्यात आला आहे.



WASHIMBEKAR Saraf & Son's
वाशिंबेकर
सराफ अँड सन्स
सुनिल तुकाराम वाशिंबेकर ९४२१०६२८६२
शेखर सुनिल वाशिंबेकर ८४५९००३४२८
सुभाष चौक, डॉ. पुंडे हॉस्पीटल शेजारी, राशिन पेठ,करमाळा, जि.सोलापूर - ४१३२०३

# कमलाभवानी मंदिरास दोन लाख किंमतीच्या चांदीच्या पादुका अर्पण



करमाळा(सं.प्र.) : श्री कमलाभवानी देवीची महापुजा येथील सेवानिवृत्त कॅप्टन भारतीय सैन्यदल मोहन गंगुबाई नामदेव शिंदे यांनी महापुजा भोगी करून श्री कमलादेवी चरणी दोन लाख रूपये किंमतीच्या चांदीच्या पादुका अर्पण केलेल्या आहेत.

स्व.गंगुबाई शिंदे व स्व.नामदेव शिंदे हे सेवानिवृत्त मोहन शिंदे यांचे आई-वडील होते. आई वडिलांची इच्छापूर्ती मुलगा मोहन शिंदे यांनी केली. मोहन शिंदे यांचा श्री जगदंबा कमलादेवी देवस्थान मंदिर समितीचे सचिव अनिल पाटील यांचे हस्ते कमलादेवीची प्रतिमा, शाल श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला. यावेळी मंदिर समिती विश्वस्त सुशिल राठोड, राजेंद्र वाशिंबेकर, व्यवस्थापक अशोक गाठे, मंदिर पुजारी बापू पुजारी, दादासाहेब पुजारी, सचिन सोरटे, किसन सोरटे, पुरोहित पुराणिक, रोहित पुजारी, धनंजय सोरटे यांचेसह प्रदीप शिंदे व संजय शिंदे उपस्थित होते.

# शेतीच्या बांधाच्या कारणावरून तरूणाकडून वृध्दास मारहाण

करमाळा(सं.प्र.) : शेतीच्या बांधाच्या कारणावरून गावातील व्यक्तीबरोबर बोलत असताना वृध्दास तरूणाने दगडाने व केबलने बेदम मारहाण केली आहे. हा प्रकार १ जुलैला सकाळी दहा वाजता गौंडरे येथे घडला आहे.

या प्रकरणी आदिनाथ अर्जुन सपकाळ (वय-६५, रा.गौंडरे) यांनी फिर्याद दिली आहे. त्यात त्यांनी म्हटले आहे, की १ जुलैला सकाळी दहा वाजता मी गावातील लोकांबरोबर बोलत असताना तेथे नागनाथ प्रभु सपकाळ हा आला व त्याने मला शेतीच्या बांधाच्या कारणावरून शिवीगाळ करून दगडाने व केबलने मारहाण करून मला जखमी केले आहे. या प्रकरणी पोलीस निरीक्षक पोपट टिळेकर यांनी गुन्हा दाखल केला असून पुढील तपास सुरू आहे.

स्पेशल क्रेजसाठी...
आगरवाल फुड हब
शुध्द शाकाहारी जेवणाची उत्तम सोय

जेवण पार्सलची उत्तम सोय
▪ पंजाबी डिशेस
▪ चायनीज
▪ साऊथ इंडियन नाष्टा
▪ चहा, कोल्ड्रींक्स
▪ पिझ्झा, बर्गर
संपर्क... 9423326655
पत्ता श्री कमलादेवी रोड, बायपास चौक, करमाळा.

डोळ्यांचा दवाखाना
डॉ.नायकुडे यांचे
श्रीजय नेत्र रुग्णालय
डॉ.सौ.भाग्यश्री रामकृष्ण नायकुडे.
M.S.(Ayu.) Gold Medalist
नेत्रतज्ञ व शल्य चिकित्सक
श्री कमलादेवी रोड, कृष्णाजीनगर करमाळा.मो.9834071218 / 9921013493
दवाखान्याची वेळ-सोमवार ते शनिवार सकाळी १०.३० ते रात्री ९.०० पर्यंत
रविवार- सकाळी १० ते दु.२ वाजेपर्यंत
इमर्जन्सी सेवा उपलब्ध
उपलब्ध सुविधा
☛ मोतीबिंदू (Catract) आधुनिक मशिनव्दारे शस्त्रक्रिया
☛ डोळ्यांवरील पडदा, तिरळेपणा, नासूर शस्त्रक्रिया उपलब्ध
☛ Nd YAG लेसर सुविधा उपलब्ध
श्रीजय ऑप्टिकल
सर्व प्रकारचे चष्मे तयार करून मिळतील.

# केम येथे दूध उत्पादक शेतकऱ्यांचे अनोखे आंदोलन



करमाळा(सं.प्र.) : केम येथे दूध उत्पादक शेतकऱ्यांनी दूध डेअरी चेअरमनला दुग्ध अभिषेक करून दुधाला ४० रूपये भाव मिळावा यासाठी अनोखे आंदोलन करण्यात आले. अनुदानापासून वंचित असणाऱ्या हजारो दुध उत्पादक शेतकऱ्यांच्या खात्यावर त्वरीत अनुदान जमा करावे तसेच चालू दुध शासन निर्णयाप्रमाणे ३४ रूपये दराने खरेदी करण्यात यावे. तसेच दुग्ध विकास मंत्री राधाकृष्ण विखे-पाटील यांनी ३.५/८.५ दुधाला ३४ रू. दर जाहीर केला होता, तसा शासन निर्णय २६ जून २०२३ रोजी काढण्यात आला. परंतु अनेक खाजगी संस्थांनी शेतकऱ्यांकडून २६ रू., २७ रू. ने दूध खरेदी केले आहे. त्यामुळे दुधाला कोणत्याही अटी, शर्ती न लावता अनुदान सहीत ४० रू. दर मिळावा व त्या शेतकऱ्यांना १ जुलै २०२३ ते १० जानेवारी २०२४ पर्यंत फरक बिले देण्यात यावेत. ज्या संस्थाकडून हे अनुदान दिले जात नाही त्यांचेवर कारवाई करावी आदी विविध मागण्यांसाठी हे आंदोलन करण्यात आले. सदर मागण्यांची पूर्तता शासनाने त्वरीत करावी अन्यथा प्रहार जनशक्तीच्या वतीने तीव्र आंदोलन करण्याचा इशारा जिल्हा सरचिटणीस बापू तळेकर यांनी दिला आहे. यावेळी प्रहारचे तालुका अध्यक्ष संदीप तळेकर, राष्ट्रवादीचे अरूण लोंढे, कालिदास तळेकर, माऊली बिचीतकर, सचिन बिचीतकर, नागनाथ मंगवडे, सतीश देवकर, सोमनाथ तळेकर सह शेतकरी उपस्थित होते.

करमाळा व परिसरातील त्वचा रूग्णांच्या सेवेसाठी
सोलापूर येथील त्वचारोग तज्ञ
डॉ.संकेत मंडलेचा MBBS, DDV (Pune)
प्रत्येक महिन्याचा दुसरा व चौथा शुक्रवारी सकाळी १० ते दु. २ पर्यंत


त्वचा विकार : नायटा/गजकर्ण, इसब, खरूज, काळे डाग, सोरायसिस, पिंपल्स्, चाई, कोंडा, स्ट्रेचमार्क, केस गळती, जुनाट खाज, ॲलर्जी, अतिरिक्त घाम येणे, वांग, नागिण, कांजण्या,नखांचे आजार, सुरमा इ.आजारांवर खात्रीशीर उपचार व सल्ला
संपर्क : डॉ.सारंगकर डेंटल क्लिनिक
करमाळा-जेऊर रोड, कॉटेज हॉस्पिटल समोर, करमाळा., जि.सोलापूर
अपॉईंटमेंट : मो.9423333904




## करमाळा शहरामध्ये

२५ एकरामध्ये निर्माण होत असलेला अत्याधुनिक सुविधांनी परिपूर्ण असा NA ओपन प्लॉटस्चा प्रकल्प !

आजची खरेदी उद्याचं भविष्य समृध्द करेल.

# दिव्यरत्न सिटी

**७०० स्क्वे.फुटांपासून ते १५०० स्क्वे.फुटांचे प्लॉटस उपलब्ध**


- वास्तुशास्त्रानूसार प्लॉट्स
- वॉल कंपाऊंड
- स्वतंत्र डी.पी. व्यवस्था तसेच रस्त्याच्या दोन्ही बाजुला पोल व स्ट्रीट लाईटसह
- अंतर्गत ३० फुटी व ४० फुटी रस्ते
- पाईपलाइन व्यवस्था

करमाळा नगरपालिका हद्दीत NA मंजूर **ले आऊट**
**स्वतंत्र सिटीसर्व्हे उतारा** व **नकाशा**
**नगरपालिका उतारा** व **NA ऑर्डर** सह उपलब्ध

- अद्ययावत ड्रेनेज सिस्टीम
- लहान मुलांसाठी खेळण्याचे मैदान
- ज्येष्ठ नागरीकांसाठी विरंगुळा कट्टा
- प्रशस्त बाग आणि वृक्षारोपणासाठी जागा
- रस्त्याच्या दोन्ही बाजुला दुतर्फा अतिशय सुंदर झाडी

**अधिक माहितीसाठी संपर्क : मो.7887557771 / 9765054415**






श्री.विजयराव पवार यांची कन्या

**कु.प्रगती विजयराव पवार** हिची अमेरिका येथील University of Southern California, Los Angeles मध्ये Master of Science in Engineering (M.S.) या उच्च शिक्षणासाठी निवड झाल्याबद्दल

# हार्दिक अभिनंदन !

पुढील वाटचालीस तसेच परदेश दौऱ्यास हार्दिक शुभेच्छा !

**शुभेच्छुक**

- **श्री.भास्करराव(तात्यासाहेब) माने-देशमुख** (चेअरमन - स्वामी समर्थ इंजिनिअर्स लि;)
- **श्री.बाळासाहेब माने-देशमुख** (मा.सरपंच, तेलगाव सीना)
- **श्री.गणेश भास्करराव माने-देशमुख** (चेअरमन - जयहिंद शुगर युनिट नं.१, आचेगाव, अक्कलकोट)
- **श्री.शालिवाहन माने-देशमुख**
- **श्री.बब्रुवान माने-देशमुख**

**समस्त माने-देशमुख परिवार, सोलापूर**